संकटग्रस्त महिलांना तातडीने मदत मिळण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या " One Stop Crises Centre " या योजनेअंतर्गत राज्यात प्रायोगिक तत्वावर सुरू करावयाच्या One Stop Crises Centre संदर्भात.......

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१५/प्र.क्र.९५/का-२
नवीन प्रशासकीय इमारत, ३रा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १ फेब्रुवारी, २०१६

संदर्भ :- केंद्र शासनाच्या ई-मेल संदेशान्वये प्राप्त No २७- २३ / २०१५ -WW,
दिनांक १४.०७.२०१५ चे पत्र व मंजूरी आदेश.

प्रस्तावना :-

संकटग्रस्त महिलांना तातडीने मदत मिळण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयाकडून " One Stop Crises Centre " ही योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत सुरवातीला प्रायोगिक तत्वावर प्रत्येक राज्यात एक " One Stop Crises Centre " कार्यान्वीत करण्यात येणार आहे. या One Stop Crises Centre व्दारे राज्यातीज संबधित पिडीत महिलेस वैद्यकीय सुविधा, पोलीस मदतकेंद्र, समुपदेशन केंद्र व कायदेशीर मदत इत्यादी तातडीने उपलब्ध होईल अशी सुयोग्य जागा तपासून तसा प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनाच्या संबंधीत मंत्रालयाकडे पाठविण्याची विनंती केद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयाने केली होती.

२. यास अनुसरून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी उपरोक्त योजनेअंर्तत राज्यात सुरु करावयाच्या नियोजित " One Stop Crises Centre " साठी शासकीय मुलींचे निरिक्षणगृह / विशेषगृह, मुंढवा, पुणे या संस्थेच्या परिसरातील ३०० चौ.मि. जागा उपलब्ध असल्याचे शासनास दिनांक १६.०६.२०१५ च्या पत्रान्वये कळविले होते. त्यानुसार केंद्र शासनाने विहित केलेल्या Guidelines नुसार एकंदरीत अंदाजे रु.६८,३४,४०७/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव या विभागाच्या दिनांक १७.०६.२०१५ च्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या संबधीत विभागाकडे मंजूरीस्तव पाठविण्यात आला होता.

शासन निर्णय:-

वरील पार्श्र्वभूमीवर केंद्र शासनाने त्यांच्या संदर्भाधीन No २७- २३ / २०१५ -WW, दिनांक १४.०७.२०१५ च्या आदेशान्वये राज्य शासनाने पाठविलेल्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता दिली असून, त्यानुसार महाराष्ट्र राज्याने सादर केलेल्या प्रस्तावानुसार विभागाच्या अखत्यारीतील शासकीय मुलींचे निरिक्षणगृह / विशेषगृह, मुंढवा, पुणे या संस्थेच्या परिसरातील ३०० चौ.मि. जागेवर सुरू करावयाच्या नियोजित " One Stop Crises Centre " च्या बांधकामासाठी केंद्र शासनाने सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाकरीता एकूण रु.३७,६८,९२७/- (रूपये सदतीस लाख

अडसष्ठ हजार नवशे सत्ताविस फक्त) इतकी रक्कम मंजूर केली असून सदरचे "One Stop Crises Centre " कार्यान्वीत करण्यासाठी येणाऱ्या आवर्ती व अनावर्ती खर्चासाठी एकूण रू. ८,१९,१२०/- (रूपये आठ लाख एकोणीस हजार एकशेवीस फक्त) इतकी रक्कम मंजूर केली आहे. तरी या निर्णयान्वये राज्यात सदरची योजना कार्यान्वीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्यात सुरू करावयाच्या उपरोक्त नियोजीत One Stop Crises Centre " सुरू करण्यासाठी आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्यामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार खालीलप्रमाणे तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी.

अ) सदरहु नियोजीत One Stop Crises Centre चे नामकरण केंद्र शासनाने मंजूर केल्याप्रमाणे " **सखी** " असे करण्यात यावे.

ब) याबाबत केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी राज्यात सुरू करावयाच्या नियोजीत One Stop Crises Centre साठीच्या ईमारतीच्या बांधकामाचे Structural Model केंद्र शासन अंगिकृत उपक्रमातील NBCC (National Buildings Construction Corporation Ltd) या संस्थेमार्फत तयार केले असून, या आदेशासोबत जोडलेल्या Approved Drawings and Specifications नुसार राज्यात स्थापन करावयाच्या One Stop Crises Centre साठीच्या इमारतीचे बांधकाम त्वरीत पुर्ण करावे व सदरहु One Stop Crises Centre कार्यान्वीत करावे.

क) याकरीता केद्र शासनाने नोडल व्यक्ती Nodal Person म्हणून Mr. Rajender Mohan, Manager (Planning)-NBCC Ltd, Mob- ०९८१०२३६०१३ यांची नियुक्ती केलेली आहे.

३. केंद्र पुरस्कृत या नविन योजनेअंतर्गत राज्यात सुरू करावयाच्या One Stop Crises Centre साठी येणारा खर्च केंद्र शासनाच्या संदर्भाधीन No २७- २३ / २०१५ -WW, दिनांक १४.०७.२०१५ च्या आदेशात दिलेल्या सुचनांनुसार करण्यात यावा. व याबाबतचे लेखे स्वतंत्र ठेवून याबाबतच्या बांधकामाची सद्य:स्थिती व झालेल्या खर्चाचा उपयोगिता प्रमाणपत्र इत्यादीचा तपशील वेळोवेळी केंद्र शासनाच्या संबधीत मंत्रालयाकडे व या विभागाकडे पाठविण्याची दक्षता आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी घ्यावी.

४. या योजनेअंतर्गत होणारा खर्च कोणत्या उपलेखाशिर्षाखालील तरतूदीतून भागविण्यात यावा, याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

५. सदर निधीचा विनियोग करण्यासाठी आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना आंहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१६०२०११३०९३५५०३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Mahendra Babusing Hajari

Digitally signed by Mahendra Babusing Hajari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Mahendra Babusing Hajari
Date: 2016.02.01 13:09:37 +05'30'

(म.बा.हजारी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) मा.मंत्री, नियोजन / वित्त विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.राज्यमंत्री, महिला व बाल विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
७) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,
१०) निवड नस्ती, का-२.